IIPIMRJ | IIP International Multidisciplinary Research Journal

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 03 No. Issue I, (January-March) (2026)
Impact Factor: GSRD-IF: 5.001
ISSN: 3049-2734 (Online)

# आधुनिक भारताच्या विकासामधील राजा राममोहन रॉय यांचे सामाजिक कार्य आणि योगदान

**प्रा. मंगेश माधव देवडे**
(इतिहास विभाग)
रा. ब. नारायणराव बोरावके कॉलेज, श्रीरामपूर
ता.श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर.

**Article Info**

***Article History:***
Received: 24th January 2026
Accepted: 01st February 2026
Published: 05th February 2026

***Keywords:***

*आधुनिक भारत*
*राजा राममोहन रॉय*

**ABSTRACT**

राजा राममोहन रॉय यांनी धार्मिक आणि सामाजिक सुधारणा चळवळीची सुरुवात केली. भारतामध्ये ब्रिटीशांच्या सत्तास्थापनेनंतर अनेक सुधारकांनी विविध क्षेत्रात कार्ये केली असली तरी रॉय यांचे कार्य आकाशात असणा-या सूर्याइतकेच प्रकाशमान असल्याचे दिसून येते. सर्वप्रथम ब्रिटीशांनी बंगाल प्रांत जिंकला. अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये राजा राममोहन रॉय यांनी भारतात नवजागरणाची सुरुवात केली. रॉय यांनी पाश्चात्य संस्कृती आणि बारतीय संस्कृती अशा दोनही संस्कृतीचा सखोल अभ्यास केला होता. संस्कृत, फारशी, अरबी, ग्रीक, हिब्रू, लॅटीन, इंग्लिश आणि फ्रेंच या भाषा ते शिकले होते. इ.स. १८१७ मध्ये त्यांनी स्वतः कलकत्ता येथे इंग्लिश स्कूल स्थापन केले होते. रॉय यांनी प्रस्थापित हिंदू धर्मावर टीका केली असली तरी त्यांचा हिंदू धर्माला विरोध नव्हता. एकेश्वरवाद, नीती, विश्वधर्म, बंधुता, सद्सद्विवेक हे त्यांच्या धर्मविचारांचे विशेष होते. रॉय यांनी जातीव्यवस्थेस विरोध केला. सामाजिक क्षेत्रात रॉय यांनी स्त्रियांची परिस्थिती कशी सुधारेल यावर भर दिल्याचे दिसून येते. विधवा स्त्रियांची वाईट अवस्था आणि स्त्रियांना मालमत्तेचा हक्क व वारसा हक्क मिळण्यासाठी ते आग्रही होते. सनातन्यांच्या विरोधात जाऊन सतीविरोधी प्रथेस विरोध करण्याचे धाडस त्यांनी केले. सतीविरोधी कायदा होण्यास रॉय यांचे प्रयत्न महत्वाचे ठरले परिणामी सनातन्यांच्या रोषासही त्यांना तोंड द्यावे लागले. जगातील घडामोडींकडे तसेच युरोपातील उदारमतवादी चळवळीकडे त्यांचे लक्ष होते. जगातील राष्ट्रांच्या परस्पर सहकार्याचा त्यांनी पुरस्कार केला, ते आंतरराष्ट्रीय होते.

***Plagiarism Check Report:***
Tool Used: Turnitin
Date of Report: February 02, 2026
Similarity Index: 5%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2026 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite: Devde, M. M. (2026).** आधुनिक भारताच्या विकासामधील राजा राममोहन रॉय यांचे सामाजिक कार्य आणि योगदान. *IIP: International Multidisciplinary Research Journal (IIPIMRJ), 3(1), 691–693.*

**प्रस्तावना –**

भारतामध्ये ब्रिटीशांनी केलेली शिक्षणाची व्यवस्था आणि सामाजिक सुधारणा कायदयामुळे परिवर्तनाची सुरुवात झाल्याचे दिसून येते. इंग्रजी भाषेच्या शिक्षणामुळे पाश्चिमात्य विचारांची ओळख भारतीय तरुणांना झाली, त्यामुळे भारतातील तरुण वर्गात युरोपीय उदारमतवाद आणि भौतिकवाद याविषंयी आत्मीयता निर्माण झाल्याचे दिसते. या काळामध्ये स्वातंत्र्य, समता आणि बुध्दीवादाच्या मार्गाने प्रचलित सामाजिक व धार्मिक परिवर्तन घडवून आणण्याचे प्रयत्न झाले. त्यानंतर प्राचीन संस्कृतीची श्रेष्ठता स्पष्ट करण्याचा प्रयत्न झाला तसेच पाश्चात्य आणि प्राचीन संस्कृती यांचा समन्वय साधण्याच्या दृष्टीने वाटचाल सुरु झाली होती. या समाजसुधारणांच्या कार्यामध्ये राजा राममोहन रॉय यांचे कार्य अतिशय महत्वाचे आहे. राजकीय जागृतीबरोबरच सामाजिक सुधारणांचा प्रारंभ रॉय यांच्यापासून झाला.

आधुनिक भारताचे जनक म्हणून राजा राममोहन रॉय यांचा उल्लेख केला जातो. युरोपियन नवजागरण काळातील जे स्थान लिओनार्ड-द-व्हिन्सी, गॅलिलिओ, डान्टे, बेकनचे होते तेच स्थान भारतीय आधुनिक नवजागरणामध्ये रॉय यांचे होते. १७७२ मध्ये बंगालमध्ये सनातनी कुटुंबात रॉय यांचा जन्म झाला. मूर्तिपूजेस त्यांनी विरोध केला. त्यांचे विचार मूर्तीपूजेविरुध्द असल्यामुळे त्यांनी घराबाहेर पडावे लागले. त्यांच्या वडीलांचे नाव रमाकांत तर आईचे नाव तारिणीदेवी होते. घरातून बाहेर पडल्यानंतर त्यांनी सर्वधर्माचा सखोल अभ्यास केला. तसेच जगातील अनुभव घेत असताना त्यांनी ज्ञानार्जनही चालू ठेवले. अरबी, फारसी, इंग्रजी, फ्रेंच, हिब्रू, ग्रीक इत्यादी भाषांचे त्यांनी शिक्षण घेतले. त्यामधून त्यांची पुढील सामाजिक कार्याची पार्श्वभूमी तयार झाली. १८१५ मध्ये त्यांनी आत्मीय सभेची स्थापना केली. यामधूनच १८२८ साली ब्राम्हो समाजाची स्थापना करण्यात आली. आपल्या विचारांच्या प्रसारासाठी, संघटनेसाठी व प्रत्यक्ष कार्यासाठी राजा राममोहन रॉय यांनी ज्या संस्था स्थापन केल्या त्यापैकी ही सर्वात महत्वाची संस्था आहे. रॉय यांच्या धार्मिक व सामाजिक धोरणांचा पुरस्कार या संस्थेन केला.

या काळात भारतीय स्त्रियांना पतीच्या मृत्यूनंतर सती जावे लागत असे. त्यांची स्वतःची मोठी भावजय सती जाताना पाहीली. त्यामुळे त्या घटनेचा त्यांच्या मनावर खोलवर गंभीर परिणाम झाला. समाजसुधारणा कार्यात त्यांनी सतीबंदी कायदा व्हावा म्हणून मोलाचे प्रयत्न केले, या प्रयत्नाचे फळ म्हणजे १८२९ मध्ये गव्हर्नर जनरल लॉर्ड बेंटीकने सतीबंदीचा कायदा समंत केला. सतीप्रथेबरोबरच त्यांनी बालविवाहाला विरोध केला. स्त्रीशिक्षणास पांठीबा दिला. बहुपत्नीत्व, विधवांची दुरावस्था यावंर ते टीका करत असत. स्त्रियांनी मालमत्तेचा हक्क व वारसा हक्क मिळावा असा त्यांनी आग्रह धरला होता. त्यांना जातिव्यवस्थेस विरोध केला. जातीव्यवस्थेतील विषमतेमुळे देशप्रेम लोप पावते असे त्यांचे मत होते. त्यांनी एकेश्वरवादावर भर दिला. समाजातील प्रचलीत जातींमधील भेदभाव नष्ट करणे, स्पृश्याअस्पृश्यता नष्ट करणे, बालविवाह, सतीप्रथा, बहुभार्याविवाह, बालहत्या नष्ट करणे, विधवा विवाह प्रचलीत करणे, अंधश्रध्दा व अनिष्ट रुढी नष्ट करणे इत्यादी अनिष्ट रुढींचे निर्मूलन करण्यासाठी ब्राम्हो समाज संस्थेच्या वतीने प्रयत्न करण्यात आले.

राजा राममोहन रॉय यांनी बंगालमधील जमीनदारी, सरकारचे करमुक्त जमीनीवर कर बसविण्याचे धोरण यावर टीका केली. कुळाने दयायचा खंड निश्चित करावा, कंपनीचे व्यापारी अधिकार नष्ट व्हावेत, न्यायसत्ता व कार्यकारी सत्ता एकामेकांपासून अलग कराव्यात, ज्युरीची पध्दत सुरु करावी. न्यायदानात वर्णभेद पाळला जाऊ नये अशा मागण्याही त्यांनी केल्या. समाजकार्य करत असतानाच त्यांचा मृत्यू झाला. देशाची परिस्थिती सुधारावी म्हणून ते त्यांचे म्हणणे ब्रिटीश राजाराणीच्या घालण्यासाठी कानी घालण्यासाठी इंग्लडला गेले. तेथेच त्यांचे २७ सप्टेंबर १८३३ साली निधन झाले. आधुनिक भारताचे जनक राजा राममोहन रॉय यांचे एक पर्व संपले. ब्राम्हो समाजाव्दारे आपली सुधारक मते आणि संदेश त्यांनी सर्वदूर पसरविला. सामान्य जनांचे कल्याण व मानवतावाद या हेतूने लोकांचे कल्याण व्हावे यासाठी आपण प्रयत्न करायला हवेत असे त्यांचे मत होते.

संदर्भसूचीः

१. प्रि.वाय.एन.कदम, डॉ.ए.एम. सुतार,- आधुनिक युरोपचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९९७
२. प्रा. मदन मार्डीकर- आधुनिक जगाचा इतिहास, विदया बुक पब्लिशर्स, संभाजीनगर, १९९९.
३. श्री. दा. शेवडे- अर्वाचीन युरोप, विदया प्रकाशन, नागपूर, १९९१
४. प्रा. डॉ. एस.एस. गाठाळ, आधुनिक जागतिक इतिहासातील स्थित्यंतरे, कैलास पब्लिकेशन्स, संभाजीनगर, २०१५

५. डॉ. पी.जी. जोशी, आधुनिक जग, विदया प्रकाशन, नागपूर, २०००
६.लेखक- भ.ग.कुटे, संपादक – अरुणचंद्र फाटक- महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, मध्ययुगीन कालखंड (राजकीय व सामाजिक इतिहास), दर्शनिका विभाग, मुंबई, २०१४
७. प्रा. व्हि. के. जाधव- आधुनिक भारताचा इतिहास, विदया प्रकाशन, नागपूर, २००४.
८. डॉ. डी.डी. कोसंबी – प्राचीन भारतीय संस्कृती व सभ्यता, डायमंड पब्लिकेशन्स, २००६.
९. डॉ. डी.डी. कोसंबी – भारतीय इतिहासाचा अभ्यास, अनुवाद-दि. का. गर्दे, डायमंड पब्लिकेशन्स, २००६
१०. र.ना.गायधनी, व.ग.राहुरकर- प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे , २०१३.